# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. स.आ.'एल' / सा./ ५६५६ / परि. दि. १३.०२.२०२४.

बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय
'एल' विभाग, पहिला मजला,
लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,
स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पश्चिम)
मुंबई – 400 070.

विषय :- विकास नियोजन नियमावली ३३ (१२) (ब) २०३४ अंतर्गत 'एल' विभागातील हाती घेण्यात आलेल्या रस्त्यांच्या रुंदीकरणाबाबत.

संदर्भ :- १) AC/Estate/472811/AE (I)-II दि. २०.०६.२०२३.
२) AC'L'/ Gen/4206/A.E. (M) 'L' dt 15.12.2023.
३) MDM/P/ 3739 dt 22.12.2023.

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागामार्फत संदर्भ क्र १ नुसार प्राप्त महानगरपालिका सुधारित नियमावली ३३ (१२) (ब) २०३४ अंतर्गत विविध ठिकाणचे रस्ता रुंदीकरण प्रकल्प हाती घेण्याचे योजिले आहे. नवीन सुधारित धोरणानुसार प्राधन्यक्रम तयार करुन सुरवातीस ०३ रस्ते रुंदीकरण प्रकल्प हाती घेऊन ती पूर्ण करणे किंवा एकावेळेस अशी एकूण ०३ रस्ते रुंदीकरण प्रकल्प हाती असणे क्रमप्राप्त आहे. यास अनुसरुन 'एल' विभागामार्फत सुरुवातीस प्राधान्याने ०३ रस्ते मनपा सुधारित नियमावली ३३ (१२) (ब) २०३४ अंतर्गत रस्ता रुंदीकरण करण्याचे योजिले आहे.

| अनु. क्र. | रस्ताचे नाव | एकूण बाधित बांधकामे |
|---|---|---|
| १ | हलाव पुल रोड ते एस. सी. एल. आर. जोडणारा रस्ता | १७९ |
| २ | सहारा मेडिकल जंक्शन ते न्यु हॉल रोड जोडणारा रस्ता | ११२ |
| ३ | मलिक लियकत हुस्सेन मार्ग व सिताराम भैरू यांचे जंक्शन | १५१ |

उपरोक्त ०३ प्राधान्यकृत रस्तांची पुढील रस्ता रुंदीकरण प्रक्रिया परिपत्रक क्र AC/Estate/472811/AE (I)-II दि. २०.०६.२०२३ अन्वये राबविण्याकरिता मा उप आयुक्त (परि-५) यांची मंजुरी घेण्यात आली आहे.

तरी सदर रस्तांवरील इच्छुकपात्र झोपडीधारकाना परिपत्रक क्र AC/Estate/472811/AE (I)-II दि. २०.०६.२०२३ अंतर्गत घेण्याकरीता इच्छुक विकासकामार्फत प्रयत्न करण्यात यावेत.

सही/-
१३.०२.२०२४
**सहाय्यक आयुक्त 'एल' विभाग**

Scanned with OKEN Scanner